**MHPU250013742021**

## फौ.कि.अर्ज क्र. २८७/२०२१ मधील निशाणी ३८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार तर्फे जादा सरतपास देणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे अर्जातील कथनानुसार, अर्जदार हिने दि. १६/३/२०२३ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून, तिचे उलटतपासास सुरुवात झालेली आहे. मात्र नि.क्र. ३ व सदर अर्जासोबत कागदयादीने दाखल केलेल्या कागदपत्रांसंदर्भात अर्जदार हिचा सरतपास घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जाबदेणार यांचेवर कोणताही अन्याय होणार नसून, अर्ज नामंजूर केलेस अर्जदार हिचेवर अन्याय होणार आहे. सबब, नि.क्र. ३ व सदर अर्ज दाखल केलेदिवशी दिलेल्या कागदपत्रांबाबत अर्जदाराचा सरतपास घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जावर जाबदेणारतर्फे म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवलेली आहे. जाबदेणारचे म्हणण्यानुसार, अर्जदारतर्फे सदरकामी एकही कागदपत्राची मुळ अथवा सत्यप्रत दाखल केलेली नसून, सर्व कागदपत्रे हे छायांकित प्रतीत आहेत. त्यामुळे अर्जदाराचा जादा सरतपास घेणेची आवश्यकता नसल्याने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, अर्जदाराने मुळ अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण कायदयान्वये दाखल केलेला आहे. अर्जदारतर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. ३४ वर दि. १६/३/२०२३ रोजी दाखल केलेले असून नि.क्र. ३ चे कागदयादी सोबत जाबदेणार क्र. १ यास दिलेल्या नोटिसीची स्थळप्रततसेच नि.क्र. ४२ सोबत ७/१२ उतारे, घराचे उतारे, कर आकारणी उतारे इ. मुळ कागदपत्रे दाखल केल्याचे दिसून येते. सदर कागदपत्रांना अर्जदाराचे पुराव्यादरम्यान निशाणी देणे आवश्यक असून, अदयाप अर्जदाराचा संपूर्ण उलटतपास जाबदेणार मार्फत घेतला गेला नसल्याने जाबदेणार यांना सदर कागदपत्रांबाबत योग्य तो उलटतपास नोंदवणेची मुभा

उपलब्ध आहे. सदर परिस्थिती विचाराधीन घेता अर्जदाराचा अर्ज मंजूर केलेस जाबदेणार यांचे कोणतेही नुकसान होणार नसून अर्ज नामंजूरीमुळे मात्र अर्जदाराचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदार यांचा प्रस्तुत अर्ज नि. ३८ मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारास तिचा जादा सरतपास नोंदवणेची परवानगी देणेत येते. पुढील नेमले तारखेस अर्जदार हिचा जादा सरतपास नोंदवलेनंतर जाबदेणार यांना अर्जदाराचा उलटतपास नोंदवणेची मुभा राहील.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

(पी.व्ही.सपकाळ)

दि. २२/०२/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जुन्नर

# **शेरा**

मी शपथेवर सांगतो की, आदेश/निकालपत्रातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर |
| लघुलेखकाचे नांव | : | योगेश के. कोटस्थाने |
| निकाल तारीख | : | २२/०२/२०२४ |
| पिठासीन अधिका—याने आदेश/निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | : | २२/०२/२०२४ |
| आदेश/निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | २२/०२/२०२४ |